## फेर– निवीदा सूचना :–

जिल्हा व सत्र न्यायालय, यवतमाळ या कार्यालयातील कागदी कातरन (वेस्ट पेपरची रद्दी) विकावयाची आहे. करिता ज्या लोकांना कागदी कातरन रद्दी विकत घ्यावयाची असेल त्यांनी आपली निविदा या कार्यालयास दि. १२ / ०३/२०२४ चे सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत सादर करावी. त्यानंतर कोणतीही निविदा स्विकारण्यात येणार नाही.

**कागदी कातरन (रद्दी) विकत घ्यावयाच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत.**

१) जमा असलेली कागदी कातरन (रद्दी) अंदाजे ५००० किलो आहे.

२) निविदेमध्ये दर्शविलेल्या कागदी कातरन (रद्दीचा) भाव हा प्रती २५ किलो प्रमाणे लिहावा.

३) संपुर्ण मालाची किंमत एकमुस्त दयावी लागेल.

४) खरेदीदार यांनी जिल्हा व सत्र न्यायालय, यवतमाळ यांचेकडील रद्दी बारदान्यांसह घेतल्यास प्रति बारदाना रूपये २०/—शुल्क अतिरिक्त आकारण्यात येईल.

५) ज्यांना या कार्यालयात निविदा सादर करावयाच्या असतील त्यांनी निविदेसोबत अनामत रक्कम १०,०००/— (अक्षरी दहा हजार रूपये फक्त) स्वत: जमा करावी. त्याशिवाय कोणतीही निविदा विचारात घेतली जाणार नाही.

६) ज्यांची निविदा मंजुर होईल त्यांनी कागदी कातरन (रद्दी) मोजुन घेण्याकरीता तराजु वनज काटयात व सर्व माल भरण्याकरीता पोत्यांची व्यवस्था करून तो माल येथून नेण्याची व्यवस्था करावी.

७) निविदा मंजुर झाल्याचे कळल्यापासून माल तीन दिवसाच्या आत किंवा वाढविलेल्या मुदतीच्या आत उचलून न्यावा लागेल. तसे न केल्यास नवीन निविदा पुन्हा बोलाविण्यात येईल व माल विकल्या जाईल.

८) असे करताना सरकारला जे काही नुकसान होईल ते प्रथम ज्यांची निविदा मंजुर झाली होती व ज्याने माल उचलून नेला नाही, त्यांची अनामत रक्कम सरकारला जप्त (फॉर्फिटेड) करण्यात येईल व झालेल्या नुकसानाची रक्कम त्यांचे कडुन वसूल करण्यात येईल.

९) कोणतीही निविदा कारण न दाखविता नामंजुर करण्याचा अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, यवतमाळ यांना राहील.

आदेशानुसार,

प्रबंधक

जा. क्रं. ११७०/वित्त/२०२४. जिल्हा न्यायालय,यवतमाळ

दिनांक :२८/२/२०२४

प्रतिलीपी माहितीस व योग्य कार्यवाहीस अग्रेषित :

१) जिल्हा व सत्र न्यायालय,यवतमाळ येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरीता.

२) जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरीता.

३) तहसिल कार्यालय,यवतमाळ येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरीता.

४) जिल्हा परीषद कार्यालय,यवतमाळ येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरीता.

५) सार्वजनिक बांधकाम विभाग, यवतमाळ येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरीता.

६) संगणक विभाग, जिल्हा व सत्र न्यायालय, यवतमाळ सदरची प्रत जिल्हा व सत्र न्यायालय,यवतमाळ चे संकेतस्थळावर प्रसिध्दीकरीता.

वि.दिवाणी न्यायाधीश व.स्तर,यवतमाळ
यांना बजावणी करीता सविनय सादर.

प्रबंधक

जिल्हा न्यायालय,यवतमाळ